| MHST020006962026 | नियमित दिवाणी दावा क्रमांक २२४/२०२६<br>दिदारअली वि. शब्बीर अली व इतर |
|---|---|

**नि. क्र. १० खालील आदेश.**

***आदेश पारित दिनांक १६.०५.२०२६***

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. १ व २ यांचेविरुध्द दावा मिळकतबाबत त्यांनी जैसे थे परिस्थिती ठेवावी यासाठी दाखल केला आहे.

०२. अर्जातील कथने थोडक्यात अशी की, वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द प्रस्तुतचा दावा निरंतर ताकीदीसाठी व अनुषंगिक मागण्यांसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यात वादी यांनी तुर्तातुर्त मनाईचा अर्ज दिलेला आहे. प्रतिवादींना नोटीस व समन्स बजावणी झाली आहे, त्याबाबतचा अहवाल अभिलेखावर दाखल आहे. प्रतिवादी दावा घर मिळकत पाडुन त्याठिकाणी नवीन बांधकाम करण्याच्या तयारीत आहेत. प्रतिवादी यांनी जर वडीलार्जित घर पाडुन त्या ठिकाणी बांधकाम केलेस वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब प्रस्तुत कामी प्रतिवादी क्र. १ व २ हजर होवुन म्हणणे देत नाहीत तो पर्यंत प्रस्तुत कामी त्यांचेविरुध्द जैसे थे परिस्थिती ठेवणेबाबत आदेश व्हावा.

०३. अभिलेखाचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी क्र. १ व २ यांचेविरुध्द त्यांनी दावा मिळकतीतील वादी, प्रतिवादींच्या मालकी हक्क वहिवाटीतील घर मिळकत त्याचे वाटप झाल्याशिवाय पाडु नये व कोणतेही बांधकाम अथवा खोदकाम करु नये अशी निरंतर मनाई देण्यासाठी तसेच वाटपासाठी दाखल केला आहे. वाद कथनावरुन सदरील मिळकत ही मयत अली शेख यांची असुन त्यांना बशीर, शमशुद्दीन, निसार, शब्बीर व सलीम अशी मुले आहेत पैकी बशीर, शमशुद्दीन व निसार हे मयत झाले आहेत. वादी हा मयत शमशुद्दीन यांचा मुलगा आहे. प्रस्तुत कामी निशाणी क्र. ५ कडे प्रतिवादी क्र. १ व २ यांचेविरुध्द तुर्तातुर्त ताकीद अर्ज दाखल

करुन त्यांनी दावा मिळकतीतील घर प्रतिवादी क्र. १ व २ यांनी पाडु नये व तेथे नवीन बांधकाम करु नये अशी मागणी केली आहे. घर मिळकत ही मौजे गुरुवार पेठ, ता.जि.सातारा येथील सिटी सर्वे क्र. ४७८अ, ज्याचे क्षेत्र १८८.६० चौ.मी. ज्याच्या चतुर्सिमा पुर्वेस रस्ता, दक्षिणेस इमरान शेख यांचे घर, पश्चिमेस म्युन्सीपल रस्ता व उत्तरेस अरुण मोहिते यांचे घर अशी आहे. अभिलेखावरील निशाणी क्र. ९ वरुन असे लक्षात येते की, प्रतिवादी क्र. १ व २यांना प्रस्तुत दाव्याचे समन्सची व निशाणी क्र. ५ कडील तुर्तातुर्त मनाईच्या अर्जाचे नोटीसची बजावणी ही दिनांक ११/०५/२०२६ रोजी झाली आहे. परंतु ते आजरोजी न्यायालयात हजर झालेले नाहीत. जर त्यांनी वादी कथन करत असलेप्रमाणे दावा मिळकत म्हणजेच वर नमुद केलेले घर हे जर पाडले तर दाव्याचा उद्वेश राहणार नाही. सबब दावा मिळकत ही नष्ट होऊ नये म्हणुन न्यायहिताच्या दृष्टीने वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे योग्य ठरेल. सबब मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज निशाणी क्र. १० मंजूर करणेत येत आहे. |
| २. | प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकत मौजे गुरुवार पेठ, ता.जि.सातारा येथील सिटी सर्वे क्र. ४७८अ मधील घर पाडु नये यासाठी त्यांनी घराबाबत पुढील तारखेपर्यंत जैसे थे परिस्थिती ठेवावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. |
| ३. | सदर आदेशाची प्रत प्रतिवादी क्र. १ व २ यांना पाठविणेसाठी वादी यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी. |

MAHADEOKOLI INDRAJIT GOVARDHAN

Digitally signed by MAHADEOKOLI INDRAJIT GOVARDHAN
Date: 2026.05.16 17:45:16 +0530

(आय.जी.महादेवकोळी)

दिनांकः– १६.०५.२०२६ ३ रे सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,

सातारा.